

दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



Title Code- MAHMAR-51647

संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com


वर्ष २ रे    अंक : ६६०. वा    मंगळवार    दि. २३ जानेवारी २०२४    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये


# महसूलमधील भ्रष्टाचाऱ्यांवर जिल्हाधिकारी पाटील कारवाई करणार की नाही?

# महसूल आयुक्तांच्या आदेशावर देखील ढिसाळपणा कायम...

जनसंचलन/बुलढाणा

येथील महसूल विभागात बोकाळलेल्या भ्रष्टाचारासंदर्भात गेल्या अनेक महिन्यांपासून सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन सातत्याने वृत्तमालिका प्रकाशित करून त्यासंदर्भात सर्व माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम करीत आहे. हे सर्व होत असले तरी दुसरीकडे महसूल विभागातील काही भ्रष्टाचारी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात खुद्द जिल्हाधिकारी किरण पाटील हे ढिसाळपणा करीत असल्याचे दिसत आहे. यावरून एक स्पष्ट होते आहे की, महसूल विभागातील भ्रष्टाचाराचे प्रकरण हे मागील पानावरून पुढे सुरू राहण्याची शक्यता आहे. कारण महसूल आयुक्तांकडून दोनदा पत्र मिळून देखील जिल्हाधिकारी किरण पाटील हे भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करण्यात कुचराई करीत आहेत. त्यामुळे महसूलमधील भ्रष्टाचार कधी संपेल की नाही, याबाबत प्रश्नचिन्ह उभं झालं आहे. बुलढाण्याच्या महसूल विभागात गेल्या अनेक वर्षांपासून भ्रष्टाचाराने प्रचंड थैमान घातले आहे. त्यातही मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांनी तर भ्रष्टाचारात आजपर्यंत जवळपास पीएचडी केलेली आहे. टेकाळे यांच्या साथीला आणखी बरेच भ्रष्टाचारी साथी जिल्हा महसूल विभागात बोकाळले आहेत. त्यामुळे महसूल विभाग राज्यात भ्रष्टाचाराचा एक आयकॉन बनला आहे. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन गेल्या अनेक दिवसांपासून यासंदर्भात सातत्याने वृत्तमालिका प्रकाशित करीत आहे. मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांनी भ्रष्टाचाराचे जे थैमान महसूल विभागात घातले आहे, त्याला तर इतिहासात कुठे तोड नसेल असे त्यांचे कार्य आहे. विजय दत्तात्रय टेकाळे यांनी महसूल विभागात जमीन महसूल अधिनियमाची प्रचंड अशी वासलात लावली. अनेक सर्वसामान्य नागरिकांची प्रचंड लुबाडणूक केली. भ्रष्टाचारातून बक्कळ पैसा कमावला. दुसरीकडे ज्या शासनाकडून वर्षानुवर्षे पगार घेतला, त्या शासनाच्या महसूलालाही चुना लावला. अनेक वेळा न्यायालयाचा अवमान करून कामकाज रेटले. वर्षानुवर्षे एकाच पदावर, एकाच कार्यालयात नियमबाह्य काम केले. त्या पलीकडे जाऊन आपल्या भ्रष्टाचारात इतर अधिकाऱ्यांनाही सामील करून घेतले. या सर्वांतून प्रचंड अवैध पैसा जमा केला व त्या पैशातून अवैध संपत्तीही स्वतःच्या व आपल्या नातेवाईकांच्या नावावर जमा केली. एव्हढे सगळे प्रताप करून देखील वर्षानुवर्षे टेकाळेंवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. टेकाळेंच्या भ्रष्टाचारावर सर्वच अधिकाऱ्यांकडून पांघरुण घालण्यात आले. यातून मग हा भ्रष्टाचाराचा महामेरू प्रचंड बहरत गेला. टेकाळेंच्या या भ्रष्टारात समर्थ साथ दिली ती तहसीलदार रुपेश खंडारे यांनी. टेकाळे यांच्या भ्रष्टाचार प्रकरणी विभागीय चौकशी सुरू असताना टेकाळेंचे अवैध संपत्तीचे पितळ उघडे पडू नये, यासाठी रूपेश खंडारे यांनी आतून टेकाळेंशी संगनमत केले आणि नियमबाह्य काम करीत त्यांना उघडपणे मदत केली. खरे तर या गुन्ह्यासाठी रुपेश खंडारे यांच्यावर कठोर कारवाई करणे अपेक्षित आहे. परंतु जिल्हाधिकारी असो किंवा आणखी कोणीही वरिष्ठ अधिकारी खंडारे यांच्यावरही कोणतीच कारवाई अद्याप करण्यात आलेली नाही. टेकाळे असो किंवा खंडारे या सर्व भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्याचे काम हे विद्यमान जिल्हाधिकारी किरण पाटील जिल्ह्यात येण्यापूर्वीपासूनच सुरू होते. तत्कालीन जिल्हाधिकारी तुम्मोड यांनीही नियमबाह्य पद्धतीने टेकाळे व खंडारे यांना वाचवण्याचे काम केले. त्यानंतर काही महिन्यांपूर्वी जिल्हाधिकारी किरण पाटील हे जिल्ह्यात आले. त्यांच्याकडून तरी भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई होईल, अशी अपेक्षा होती. त्या दृष्टीने दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने स्वतः प्रयत्न केले आणि जिल्हाधिकाऱ्यांना यासंदर्भात सर्व कागदपत्रे पुरावे दिली. एव्हढेच नाही तर सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनकडून सातत्याने अमरावती महसूल आयुक्तांकडेही भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात पाठपुरावा केला. त्यानंतर महसूल आयुक्त कार्यालयातून हालचाली झाल्या आणि तहसीलदार रुपेश खंडारे यांच्यावर कारवाई करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी पाटील यांना निर्देश देण्यात आले. या निर्देशानंतर जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करण्यात ढिसाळपणा दाखवला. त्यामुळे पुन्हा एकदा सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने महसूल आयुक्त




कार्यालयात संपर्क करण्यात आला. त्यानंतर महसूल आयुक्त कार्यालयातून जिल्हाधिकाऱ्यांना कारवाई संदर्भात चक्क स्मरणपत्र पाठवण्यात आले. खरे तर ही जिल्हाधिकारी किरण पाटील यांना चपराक आहे. परंतु यानंतरही जिल्हाधिकारी किरण पाटील भ्रष्टाचाऱ्यांवर कोणतीही कारवाई करताना दिसून येत नाही. त्यामुळे आता खरंच जिल्हाधिकारी महसूलमधील भ्रष्टाचार संपवणार की नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. आगामी काळात जर लवकरात लवकर रुपेश खंडारे आणि विजय टेकाळे यांच्यासारख्या भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई झाली नाही, तर दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज पुन्हा एकदा महसूल आयुक्त कार्यालय आणि राज्य शासनाकडे पाठपुरावा केला जाणार आहे, हे मात्र निश्चित.

अजून बरेच काही पुढील भागात...

## वाईट शक्तींचा विनाश होऊन देशात सुराज्य निर्माण करण्याची शक्ती मिळो - उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

# आळंदी येथील श्री साईबाबा मंदिरामध्ये विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते प्रभू श्रीरामाचे पूजन आणि महाआरती संपन्न...



वृत्तसंस्था/पुणे

रामाची दीपावली सर्व घरांमध्ये साजरी होत आहे. यातून लोकांची भक्ती, श्रद्धा आणि आस्था दिसत आहे. जगातील, भारतातील ज्या वाईट शक्ती आहेत त्यांचा विनाश व्हावा आणि देशामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनेप्रमाणे सुराज्य निर्माण करण्याची शक्ती पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांना मिळावी अशी प्रार्थना विधानपरिषद उपसभापती तथा शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी यावेळी केली. तसेच सदाचारकडे, चांगल्या मार्गाकडे जाण्यासाठी या उत्सवामधून शक्ती मिळावी अशी अपेक्षा डॉ. गोऱ्हे यांनी व्यक्त केली. आज अयोध्येतील भव्य राम मंदिरात, प्रभू श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा कार्यक्रम संपन्न होत असतानाच देशभरात देखील या सोहळ्याचा उत्सव साजरा केला जात आहे. याच पार्श्वभूमीवर आज आळंदी येथील श्री साईबाबा मंदिरात, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते भगवान श्री रामांच्या मूर्तीचे पूजन, महाआरती व होमहवन करण्यात आले. याप्रसंगी, श्री साई सेवा प्रतिष्ठान ट्रस्ट, वडमुखवाडी विश्वस्त आणि अध्यक्ष श्री. सुभाष नेलगे, श्री. शिवकुमार नेलगे, मंदिराचे पुजारी अमोल पाठक व महेश मोकाशी, पोलीस उपायुक्त श्री. शिवाजी पवार, पोलीस सहायक आयुक्त श्री. राजेंद्रसिंह गौर, पोलीस निरीक्षक श्री. मच्छिंद्र पंडित यांसह मंदिर समिती सदस्य आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अयोध्या श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा निमित्त बुलढाणा अर्बन परिवारातर्फे भक्तांसाठी दिवसभर लाडू वाटप सोहळा संपन्न...

## असंख्य राम भक्तांनी लाडू वाटप प्रसादाचा घेतला लाभ...

## बुलढाणा शहरात सियाराममय वातावरण...

जनसंचलन/बुलढाणा

गेल्या कित्येक दशकापासून भारतीय समाजकारण आणि राजकारणाच्या केंद्रस्थानी राहिलेल्या अयोध्यातील राम मंदिराच्या लढ्याचा आज गोड शेवट झाला. संपूर्ण देशातच नव्हे तर परदेशात सुद्धा आज हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आलेला आहे. आज प्रभू श्रीराम यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा पंतप्रधान नरेंद्र मोदी व मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला आहे. सर्व ठिकाणी आजचा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आलेला आहे. गेल्या तीन ते चार दिवसापासून बुलढाणा नगरीमध्ये आनंदमय भक्तीचे वातावरण सुरू आहे.नेहमी अग्रेसर असणारे बुलढाणा अर्बन परिवारातर्फे विविध कार्यक्रम सुद्धा घेण्यात आले. आज दि २२ जानेवारी बुलढाणा अर्बन यांच्या मुख्य शाखेजवळ लाडू वाटप चा कार्यक्रम आयोजित केलेला होता. लाडू वाटप प्रसादाचा असंख्य भक्तांनी लाभ घेतलेला आहे. बुलढाणा शहरामध्ये सियाराममय वातावरण दिसून आलेले आहे. जय सियाराम जय सियाराम घोषणाने बुलढाणा नगरी दुमदुमली आहे. प्रभू श्रीरामाची नगरी असलेल्या अयोध्येमध्ये तयार करण्यात आलेल्या भव्य दिव्य प्रभू श्रीरामाच्या मूर्तीची विधिवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. या निमित्ताने बुलढाणा अर्बन परिवाराचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक उर्फ भाईजी व कार्यकारी संचालक डॉक्टर सुकेश झंवर यांच्या वतीने त्यांना लाडू वाटप करण्यात आले. हा लाडू वाटप कार्यक्रम संपूर्ण दिवसभर



सुरू होता. या लाडू वाटपाचा असंख्य भाविकांनी लाभ घेतला या कार्यक्रमात सर्व कर्मचारी वृंद यांचा ही मोठा सहभाग होता.

# काँग्रेसचे गणेश बस्सी यांचे शेकडो कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश...

## घाटाखाली काँग्रेसमध्ये पडली मोठी खिंडार....

जनसंचलन/बुलढाणा

काँग्रेसचे गणेश बस्सी यांचे शेकडो कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश  घाटाखाली काँग्रेसमध्ये खिंडार बुलडाणा : बुलडाणा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार धर्मवीर संजूभाऊ गायकवाड यांचा विकास कामाचा झंझावात पाहून इतर पक्षाच्या लोकांनी त्यांच्यावर विश्वास ठेवून पक्षप्रवेश करत आहे. बुलढाणा विधानसभा मतदारसंघातून जिल्हा परिषद सर्कलसाठी अति महत्त्वाचे समजले जाणारे काँग्रेसचे रोहिणखेड, राजुर, कोथळी सर्कल हे गणेश बशी यांचे सर्कल आहे. गणेश बस्सी यांनी जिल्हा परिषदचे समाज कल्याण सभापती असताना विकास कामे केली आहे. त्यांचा मनमिळाव स्वभाव आणि विकास कामांचा दरारा पाहून या सर्कलमधील



जनतेने त्याला भरभरून प्रेम दिलेले आहे.  लोकांच्या आग्राखातर ते आता शिंदे गटाचे आमदार धर्मवीर संजूभाऊ गायकवाड यांच्या पक्षांमध्ये पक्षप्रवेश केला आहे. यावेळी त्यांच्या सोबत तरोडा , खैरखेड, बोरखेड, कोथळी सर्कल मधील शेकडो कार्यककर्ते त्यांच्या सोबत उपस्थित होते.

# रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत आज विविध कार्यक्रम

जनसंचलन/बुलढाणा




रस्ता सुरक्षा अभियान २०२४ अंतर्गत परिवहन विभागातर्फे विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत वाहन चालकांचे नेत्र तपासणी शिबीर व जिल्हा स्कूल बस सुरक्षितता समिती आढावा बैठक घेण्यात येणार आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात हेल्मेट रॅली आयोजित करण्यात आली आहे. उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात मंगळवार, दि. २३ जानेवारी २०२४ रोजी दुपारी १२ शिबिर घेण्यात येणार आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक सुनिल कडासने अध्यक्षस्थानी राहतील. प्रमुख पाहुणे म्हणून अप्पर पोलीस अधीक्षक बाबुराव महामुनी, मुख्याधिकारी गणेश पांडे , उप मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष पवार, माध्यमिक शिक्षणाधिकारी सिद्धेश्वर काळुसे उपस्थित राहणार आहेत. रस्ता सुरक्षा अभियानाचा उद्घाटन समारंभ व हेल्मेट रॅली मंगळवारी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील अध्यक्षस्थानी राहतील. यावेळी उपस्थित राहावे, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रसाद गाजरे यांनी केले आहे.

# लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने माहिती सादर करावी- जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

जनसंचलन/बुलढाणा

आगामी काळात होणाऱ्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४च्या अनुषंगाने नोडल अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती सादर करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले. जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आज दि. २२ जानेवारी २०२४ रोजी बैठक पार पडली. यात विविध विषयाबाबत चर्चा झाली. त्यासंबंधी माहिती सादर करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. यावेळी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, सुरेश थोरात, शरद पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुहासिनी गोणेवार, उपविभागीय अधिकारी राजेश जाधव, तहसिलदार माया माने, नायब तहसिलदारसंजय बंगाळे उपस्थित होते नोडल अधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त कार्यक्षेत्रातील सर्व विधानसभा मतदार संघनिहाय अंतर्गत नोडल अधिकारी यांची बैठक घ्यावी. साहित्य, प्रशिक्षण, प्रशिक्षक, तक्ते, पायाभूत सुविधा आदी विषयाबाबत काळजी घ्यावी. नियुक्त करण्यात आलेल्या नोडल अधिकारी यांनी त्यांच्या चमूमधील इतर अधिकारी, कर्मचारी यांची स्वतंत्र रित्या बैठक घेवून त्यांना सदर कामाबाबत मार्गदर्शन करावे. त्यांना सोपविलेली निवडणूक विषयक कामे वेळेत व आयोगाने वेळोवेळी दिलेल्या दिशानिर्देशानुसार



च करावीत, याबाबत अवगत करावे. जिल्हा निवडणूक कार्यालयाकडून निवडणूक विषयक प्राप्त मार्गदर्शक सूचनांनुसार इतर अनुषंगिक बाबीची माहिती पुरविण्यात आली आहे. तसेच चेकलिस्ट, नुकसान कार्यवाही झाल्याची खात्री करून घ्यावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा, अशा सूचना डॉ. पाटील यांनी दिल्या.

बुलढाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल (पहिला मजला), जांभरूण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार

डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मातृतीर्थ सिंदखेडराजा नगरीतून संदीप शेळकेंचा नारा
# जिल्ह्यातही रामराज्य आणायचयं - संदीप शेळके...
## सिंदखेडराजा ते संतनगरी शेगावकडे श्रीराम वंदना यात्रा

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

मनात आणल असतं तर प्रभू श्रीरामचंद्र एकटे लंकेवर चालून गेले असते आणि त्यांनी रावणाचा पराभव केला असता, मात्र तसे न करता रानावनात राहणाऱ्या वंचित समाजाला, वानर-सेनेला सोबत घेत प्रभू श्रीराम चंद्रांनी विजय साकारला. सगळ्यांना सोबत कसे घ्यायचे असते, आदर्श राज्यकारभार कसा करायचा असतो याचा आदर्श प्रभू श्रीरामाकडून राज्यकर्त्यांनी घ्यायची गरज आहे. वन बुलडाणा मिशन ही लोकचळवळ प्रभू श्रीरामचंद्राचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून चालणारी चळवळ आहे. समाजातील सर्व घटकांना , आतापर्यंत शोषित ,वंचित राहिलेल्या समाजाला सोबत घेत जिल्ह्याच्या विकासाचे धोरण ठरवून विकासात्मक अंमलबजावणी करण्याचे काम वन बुलडाणा मिशन करणार आहे असे प्रतिपादन वन बुलडाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके यांनी केले. वन बुलडाणा मिशनच्या वतीने आयोजित श्रीराम वंदना यात्रेची सुरुवात सिंदखेडराजा नगरीतून श्री रामेश्वर मंदिरात आरती व राष्ट्रमाता जिजाऊंना वंदन करून करण्यात आली, याव-ळी ते बोलत होते. जिल्ह्याच्या विकासाचे एकच काम...बोलो जय श्री राम जय श्री राम असा नारा यावेळी संदीप शेळके यांनी दिला. वन बुलडाणा मिशनच्या वतीने श्री रामलल्ला मूर्ती



प्राणप्रतिष्ठा सोहळ्या निमित्त मातृतीर्थ सिंदखेडराजा ते संतनगरी शेगाव अशी श्रीराम वंदना यात्रा काढण्यात आली आहे. या यात्रेत हजारो रामभक्त सहभागी झाले आहेत. यात्रेच्या मार्गादरम्यान ठिकठिकाणी रांगोळी काढून, पुष्पवर्षाव करून यात्रेचे जंगी स्वागत होत आहे. रात्री ८ वाजता ही यात्रा संतनगरी शेगा-वात पोहचणार आहे. प्रभू श्रीरामचंद्रांनी आपल्या जीवनातून जे आदर्श घा-लून दिलेत ते लाखो वर्षानंतर देखील आपल्या पिढीसाठी अनुकरणीय आहेत. लोकप्रतिनिधी म्हणून नव्हे तर लोकसेवक म्हणून प्रभू श्रीराम चंद्रांनी राज्यकारभार केला. शोषित वंचितांच्या आयुष्यात प्रकाश आणण्याचे काम त्यांनी केली, जटायू, अहिल्या, शबरी माता ही त्याची प्रातिनिधिक उदाहरणे सांगता येतील असे संदीप शेळके म्हणाले. १४ वर्षाच्या वनवासाच्या काळात प्रभू श्रीरामांच्या पदस्पर्शाने बुलडाणा जिल्ह्याची भूमी पावन झाली आहे. सिंदखेडराजा नगरीतील श्री रामेश्वर मंदिरांची स्थापना श्रीरामांनी केली आहे, ही जिल्ह्यासाठी अभिमानास्पद बाब आहे असेही संदीप शेळके यावेळी म्हणाले. श्रीराम वंदना यात्रेच्या निमित्ताने जिल्ह्याच्या विकासाचे साकडे प्रभू श्रीरामांना घा-लणार असल्याचे संदीप शेळके म्हणाले.

# महात्मा गांधी प्रशाकिया सेवा महाविद्यालय दुधा येथिल राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उद्घाटन संपन्न

**जनसंचलन/ दुधा**




दुधा येथील स्थानिक महात्मा गांधी प्रशासकीय सेवा महाविद्यालय दुधा ता जी बुलढाणा येथिल राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर दिनांक १८ जानेवारी रोजी प्रारंभ झाले. दिनांक १८ ते २४जानेवारी या कालावधीमध्ये सदर शिबिर घेण्यात येणार आहे या शिबिरामध्ये रोज सकाळी ग्राम स्वच्छता , जनजागरण बौद्धिक व सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उद्घाटन धाड पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष ठाणेदार श्री मनीष गावंडे यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिरार्थी आणि नागरिकांना संबंधित करताना वैयक्तिक कुटुंब तसेच राष्ट्रीय जबाबदारी स्वीकारण्याची आवाहन त्यांनी केले .जीवनात कोणत्याही कामाचा तणाव न घेता जबाबदारी पूर्ण करणारा व्यक्ती हा आनंदी असतो समाधानी असतो असे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून भारतीय सुजाण नागरिक निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना महत्वाची असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले शिबिराच्या आपल्या प्रास्ताविकेमध्ये प्रा. सौ .तुपकर एम. जे. यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची महाविद्यालयीन युवकांसाठी असलेली आवश्यकता विशद केली. तसेच महाविद्यालयामार्फत राबविले जाणारे शिबिराविषयी माहिती दिली. यावेळी ह भ प श्री दीपक महाराज सावळे यांनी विद्यार्थ्यांना ग्रामगीतेच्या माध्यमातून गावाचा व स्वतःचा विकास साधण्याकडे लक्ष वेध-ले. यावेळी काही स्वयंसेवकांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी गावचे सरपंच श्री गणेश निकम उपसरपंच मंदाबाई सोनुने ग्रामसेवक श्री के के तायडे तंटामुक्ती अध्यक्ष प्रसाद सोनुने यासह महाविद्यालयाचे प्राचार्य धनवे एस. जी. प्रा.भरत धदर, प्रा.कोल्हे पी एस, प्रा डॉ विसपुते एस जे.,श्री पवन सोनुने,श्री रमेश इंगळे,श्री सुरज पवार यासह गावातील बहुसंख्या गावकरी मंडळी तसेच स्वयंसेवकांची उपस्थिती होती.

# युवक काम आटपून घरी निघाला वाटेतच अंधाराने केला घात...

**जनसंचलन/मोताळा**

सध्या अनेक ठिकाणी अंतर्गत रस्त्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरू आहे. त्यात ठेकेदाराच्या दुर्लक्षामुळे सूचना सा-वधानतेचे फलक लावण्यात आले नाही आहे. त्याचाच एक बळी बुलढाणा जिल्ह्यातील मोताळा तालुक्यात गेला आहे. भरधाव दुचाकीचा अप-घात झाल्याने २५ वर्षीय युवकाचा मृत्यू झाला.मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना २१ जानेवारी रोजी रात्री मोताळा येथील ग्रामीण रुग्णालयासमोर निर्माणाधीन पुलाजवळ घडली. शे. अनसार असे मृतक युवकाचे नाव आहे. मोताळा तालुक्यातील कोथळी येथील शे. अनसार शे. मुसा हा २१ जानेवारी रोजी कामानिमित्त मोताळा येथे आला होता. येथील ग्रामीण रुग्णालयासमोर पुलाचे काम सुरू आहे. त्यामुळे रस्त्यावर पुलाच्या दोन्ही बाजूंनी मध्य भागापर्यंत मुरुमाचा आडवा बांध टाकण्यात आ-लेला होता.शे. अनसार हा कॉटन मार्केट रोडवरून परत येत असताना रात्रीची वेळ होती. त्यामुळे पुलावर आडवा टाकलेला मुरुमाचा बांध त्याला अंधारात दिसला नाही. त्या बांधावरून शे. अनसारची दुचाकी जोरात आद-ळली. त्यानंतर दुचाकीवरील अनसार खाली फेकला गेल्याने त्याच्या डोक्याला जबर मार लागून तो गंभीर जखमी झाले. या घटनेची माहिती मिळताच बोराखेडी ठाणेदार सारंग नवलकर, नापोकॉ विजय पैठणे, पोकॉ अभिनंदन शिंदे, दीपक पवार यांनी घटनास्थळी धाव घेत अपघातातील जखमीला नागरिकांच्या मदतीने उपचारासाठी बुलढाणा येथे हलविले. तेथे डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले.मोताळा येथील ग्रामीण रुग्णालयासमोर पुलाचे काम सुरू आहे. त्यामुळे त्याठिकाणी मुरुमाचा आडवा बांध टाकण्यात आ-लेला आहे. याठिकाणी संबंधितांनी काम सुरू असल्याचे कोणतेही फलक लावलेले नाही. तसेच रात्रीची वेळ असल्याने मुरुमाचा आडवा बांध या दुचाकी चालकास दिसला नसल्याने हा अपघात घडला आहे. रस्त्याचे काम चालू असल्याचे फलक लावलेले असते तर दुचाकीचा अपघात घडला नसता. दुचाकी चालकाचे प्राण वाचले असते, असे सांगत मृतकाच्या नातेवाइकांनी संबंधित ठेकेदारावर रोष व्यक्त केला आहे.

# प्रभु श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळानिमित्त सुंदरखेड येथे आमदार संजय गायकवाड यांच्या हस्ते महाआरती संपन्न

**जनसंचलन/ बुलढाणा**

कित्येक वर्षापासून अपूर्ण राहलेले देशावायिंचे स्वप्न आज पुर्ण झाले आहे.श्रीराम भक्तांची प्रतीक्षा अखेर संपली आणि डोळ्यांचे पारणे फेडणारे रामलल्लांचे मनोहारी रुप समोर आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अयोध्येतील भव्य आणि ऐतिहासिक राम मंदिरात रामलल्लांची विधीवत पूजा करण्यात आली. देशातचं नव्हे तर तर विदेशात सुध्दा आजचा दिवस मोठ्या उत्साहात साजरी केल्या जात आहे.गावोगावी शहराशहरात मोठ्या उत्साहात रामभक्त प्रभु श्री राम प्राणप्रतिष्ठा दिन मोठ्या जलोषामध्ये साजरी करत आहे. बुलढाणा शहरा-तील सुंदरखेड ग्रामपंचायत तर्फे मोठ्या उत्साहाने भक्तीमय वा-तावरणात साजरी करण्यात आला आहे.बुलढाणा विधानसभेचे आमदार संजय गायकवाड यांच्या हस्ते दुपारी १२.३० वाजेच्या सुमारास महाआरती घेण्यात आली आहे.त्यानंतर भव्य महाप्रसादाचेआयोजन करण्यात आले आहे.असंख्य भक्तांनी या महाप्रसाद-




ाचा लाभ घेतला आहे.तसेच सकाळी ८ वाजता श्री संत गजानन महाराज मंदिर राजमाता नगर सुंदरखेड येथे अभिषेकचा कार्यक्रम घेण्यात आला आहे.सकाळीच स्थानिक नागरिकांनी घरासमोर सडासावरन करून सुंदर रांगोळ्या काढल्या आहे.त्यांनतर घर-ावर भगवा ध्वज लावला आहे.तसेच भव्य अशी शोभायात्रा काढण्यात आली आहे. तसेच सकाळी ११ वाजेपासून आयोध्य येथे संपन्न होत असलेल्या प्रभु श्री राम यांच्या मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे प्रसारण प्रत्यक्ष पाहण्यासाठी मोठी स्क्रिनची व्यवस्था व बैठक व्यवस्था नागरिकांसाठी करण्यात आली होती.आमदार संजय गायकवाड यांच्या हस्ते लाडू वाटप हा कार्याक्रम घेण्यात आला आहे. गुलाल उधळून रामल्लाचे म्हणजेच प्रभु श्री राम यांचे स्वागत करण्यात आले आहे.या भव्य कार्याक्रमाचे आयोजन सुंदरखेड ग्रामपंचायतचे सरपंच अर्पणाताई राजेश चव्हान, ग्राम पं सदस्य शुभम पऱ्हाड,विजय इल्लरकर, शुभांगी रिंढे, संगिता चंदन, विलास खरे,मंगलसिंग राजपूत, शुभम खरे, संत गजानन महाराज मंदिर राजमाता नगर यांनी केले आहे

# अयोध्येत श्रीराम विराजमान, भव्य मंदिरात रामलल्लांची प्रतिष्ठापना, पंतप्रधान मोदींच्या हस्ते पूजा...

वृत्तसंस्था/अयोध्या

श्रीराम भक्तांची प्रतीक्षा अखेर संपली आणि डोळ्यांचे पारणे फेडणारे रामलल्लांचे मनोहारी रुप समोर आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अयोध्येतील भव्य आणि ऐतिहासिक राम मंदिरात रामलल्लांची विधीवत पूजा करण्यात आली. ५०० वर्षांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर राम मंदिरात रामलल्लांची मूर्ती विराजमान झाली. पूजेव- ेळी रामलल्लांच्या गर्भगृहात पंतप्रधान मोदींसह सरसंघचालक मोहन भागवत, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, राज्यपाल आनंदीबेन पटेल उपस्थित होते.रामलल्लांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाली, त्यावेळी हेलिकॉप्टरमधून राम मंदिरावर पुष्पवृष्टी करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते श्रीरामाची विधीवत पूजा झाल्यानंतर आरती करण्यात आली.अयोध्यानगरीत भक्तांचा महासागर उसळला होता. मात्र फक्त अयोध्याच नव्हे, तर अवघा देश राममय झाला आहे. महाराष्ट्रातही राम भक्तांनी राम मंदिराच्या उद्घाटनाचा सोहळा साजरा केला.अयोध्येत विविध क्षेत्रातील मान्यवरांनी हजेरी लावली. उद्योगपती मुकेश अंबानी, अनिल अंबानी, अभिनेते अमिताभ बच्चन, अभिषेक बच्चन, रजनीकांत, माधुरी दीक्षित, रणबीर कपूर, आलिया भट यांची उपस्थिती होती.अयोध्येत २५ हजारांहून अधिक पोलिस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. यामध्ये केंद्रीय पोलिसांचाही समावेश आहे. विमानतळापासून पंतप्रधान नरेंद्र मोदी येणार असणारा मार्ग ङ्गएसपीजीफ्च्या निरीक्षणाखाली आहे. राष्ट्रीय सुरक्षा पथकाने (एनएसजी) मंदिर परिसराची पाहणी करून सुरक्षा व्यवस्था भक्कम असल्याची खात्री केली





# मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत सरकार ठाम, जरांगे यांनी आंदोलन स्थगित करावे, मुख्यमंत्री शिंदे यांचे आवाहन







वृत्तसंस्था/मुंबई

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर आक्रमक झालेल्या आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी आपले आंदोलन थांबवण्याचे आवाहन रविवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत राज्य सरकार ठाम असून, त्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाकडून युद्धप- ातळीवर डेटा संकलन सुरू आहे. ते पूर्ण झाल्यानंतर फेब्रुवारीमध्ये विशेष अधिवेशन बोलावण्यात येईल, अशी ग्वाहीसुद्धा त्यांनी यावेळी केले.मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलक जरांगे यांनी मुंबईच्या दिशेने कूच केले आहे. त्यांच्या या आंदोलनात लाखो मराठा बांधव सहभागी झाले असून, हे आंदोलन सध्या सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. दरम्यान, रविवारी मुंबईत एका कार्यक्रमादरम्यान मुख्यमंत्रांना याबाबत विचारले असता, त्यांनी पुन्हा जरांगे यांना आंदोलन थांबवण्याचे आवाहन केले.मराठा आरक्षणासाठी सरकार सकारात्मक आहे. टिकणारे आणि कायद्याच्या कक्षेत बसणारे आरक्षण देण्यासाठी शासन युद्धप- ातळीवर काम करत आहे. मराठा समाजाला आरक्षण देत असतानाच ओबीसी व इतर कोणत्याही प्रवर्गातील आरक्षणाला धक्का लागणार नाही, ही शासनाची भूमिका आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता मराठा आंदोलकांनी आंदोलन मागे घ्यावे, असे मुख्यमंत्री म्हणाले.सरकार आर- क्षण देण्यासाठी सकारात्मक असताना जरांगे यांनी आंदोलनाचा मार्ग धरू नये. कारण अशा आंदोलनाने नागरिकांना त्रास होणार आहे. त्यांनी आंदोलन स्थगित करावे.

## आज ३२ वर्षांनी शरयू नदी हसली अयोध्येत रामलल्लाच्या प्रतिष्ठापनेनंतर राज ठाकरेंची भावूक प्रतिक्रिया...





वृत्तसंस्था/मुंबई

तब्बल गेल्या तीन दशकांपासून भारतीय समाजकारण आणि राजकारणाच्या केंद्रस्थानी राहिलेल्या अयोध्येतील राममंदिराच्या लढ्याचा आज गोड शेवट झाला. अयोध्येत साधू-संतांच्या उपस्थितीत आणि वेदमंत्रांच्या उच्चारवात सोमवारी दुप- ारी रामलल्लाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठापनेचा सोहळा संपन्न झाला. यानंतर देशभरात रामभक्त आणि सामान्य जनतेमध्ये आनंद आणि उत्साहाची भावना पाहायला मिळत आहे. या पार्श्वभूमीवर मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी सोशल मीडियावरुन आपल्या भावना व्यक्त केल्या. आज कारसेवकांचे आत्मे सुखावले आणि ३२ वर्षांनी शरयू नदी हसली ! जय श्रीराम !, असे राज ठाकरे यांनी म्हटले आहे.

राम मंदिराच्या उद्घाटन सोहळ्यासाठी आज सकाळपासूनच अयोध्येत विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दुपारी साधारण १२च्या सुमारास प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याला सुरवात झाली. यानंतर पंतप्रधान मोदी यांनी रामलल्लाची आरती केली. मंदिरा- तून बाहेर पडल्यानंतर नरेंद्र मोदी यांनी उपस्थित जनसमुदायाशी संवाद साधला.

# लोकशाही टिकण्यासाठी पहिजे ती किंमत आम्ही मोजू,कितीही अडचणी आल्या तरी एकत्र राहावं लागेल : राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार



वृत्तसंस्था/मुंबई

सध्या देशात धार्मिक धुव्रीकरण करण्याचे प्रयत्न मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. मधू दंडवते यांनी दाखविलेल्या सर्वसमावेशक लोकशाही मार्गावर चालताना कितीही अडचणींना सामना करावा लागला, तरी आपल्याला एकत्र रहावे लागेल,फ असे अधोरेखित करतानाच, आता आपले मतभेत विसरून एकत्र आल्याशिवाय पर्याय नाही, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शदर पवार यांनी रविवारी मुंबईत केले. त्याच वेळी, ङ्गराम हा व्यक्ती, जाती, धर्मांचा नसून तो सर्वांचा आहे,फ असे प्रतिपादन जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला यांनी केले. लोकशाहीवर झालेला हल्ला जनता खपवून घेणार नाही. लोकशाही टिकण्यासाठी पहिजे ती किंमत आम्ही मोजू .जनता हुशार असते तिला फार काळ फसवता येत नाही, असं राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी म्हटलं.फारुख अब्दुला म्हणाले, ङ्गकोणताच धर्म संकटात नसून, तसे खोटे पसरवण्यात येत आहे. पक्ष सत्तेत असताना योग्य न्यायाधीश नेमले असते, ईव्हीएम मशीन आणल्या नसत्या, त्याचबरोबर निवडणूक आयोगही मजबूत केला असता, तर आज ही वेळ आली नसती.प्रा. मधू दंडवते यांच्या जन्मशताब्दीनिमित्त मुंबईतील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित सभेत शरद पवार, फारुख अब्दुला यांनी वरील प्रतिपादन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वातंत्र्यसेनानी डॉ. जी. जी. पारीख होते. या वेळी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले, खासदार कुमार केतकर, कर्नाटकचे मंत्री बी. आर. पाटील, माजी खासदार हुसेन दलवाई, शेकापचे जयंत पाटील आदी उपस्थित होते

दैनिक जनसंचलन — निडर निर्भिड — व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन — निडर निर्भिड — व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958